# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web Site : - www.ropune.org.in


जा. क्र. तंशिविकापु/विवि/करीअर मेळावा/२०११/ 2828 दिनांक :- 29 MAR 2011

प्रति ,

प्राचार्य,
शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअुनदानित, तंत्रनिकेतन संस्था,
शासकीय//अशासकीय अनुदानित/विनाअुनदानित, अभियांत्रिकी संस्था.

विषय :- पुणे जिल्हयातील आठ तालुक्यांमध्ये आयोजित व्हिजन करिअर फेअरमध्ये स्टॉल सहभागी करण्याकरिता आपल्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांना निर्देशित करणेबाबत.

संदर्भ :- पीपीसीटी/व्हिजन/११/०३/२१ दिनांक १७/०३/२०११.

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये कळविल्यानुसार पुणे जिल्हयामधील सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, मा. खा सुप्रिया सुळे यांच्या संकल्पनेतून पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टतर्फे दिनांक १ एप्रिल ते ५ मे २०११ दरम्यान पुणे जिल्हयातील ८ तालुक्यांमध्ये व्हिजन करिअर फेअर या शैक्षणिक प्रदर्शन व व्याख्यानमालेचे आयोजन करण्यांत आलेले आहे. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण व करिअरच्या विविध संधीची ओळख व्हावी, हा या उपक्रमामागील हेतू आहे. या प्रदर्शनामध्ये आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय पातळीवरील नामवंत संस्था, शासकीय विभाग सहभागी होणार आहेत.

तरी सर्व संस्था प्रमखांना विनंती करण्यांत येते की, आपण व्हिजन करीअर फेअर २०११ मध्ये संबंधीत तालुक्याच्या ठिकाणी स्टॉल सहभागी करण्याकरीता सोबत दिलेल्या मोबाईल नंबर व व्यक्तीशी संपर्क साधून आपला स्टॉल आरक्षित करावा .

सोबत :- पुणे व्हिजनचे वेळापत्रक
संपर्क किरण काळे (९०२८७२५३६८), अभिजित विटोरे (९८५०२१७३७४)

(डी. एन. शिंगाडे )
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :- श्री. शिंदे एस. बी. प्रोग्रॅमर यांना माहिती व सदर प्रत संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.

# पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट

आयोजित

# व्हिजन करिअर फेअर- २०११

## व्हिजन करिअर फेअर - पुणे जिल्हा

## वेळापत्रक

| अ.क्र. | नियोजित ठिकाण | नियोजित तारीख |
|---|---|---|
| १ | रेल्वे स्टेशन ग्राउंड, बारामती. | १,२,३ एप्रिल २०११ |
| २ | हिंगणे (खु.) बस स्टॉपजवळ, विठ्ठलवाडी, सिंहगड रोड, पुणे. | ८,९,१० एप्रिल २०११ |
| ३ | वर्धमान विद्यालय, नारळीबाग मैदान, वालचंद नगर, ता. इंदापूर. | १६,१७ एप्रिल २०११ |
| ४ | भेकराईमाता माध्यमिक विद्यालय, भेकराईनगर, ता. हवेली. | १९,२० एप्रिल २०११ |
| ५ | शिवाजी हायस्कूल, ता. भोर. | २३,२४ एप्रिल २०११ |
| ६ | वाघिरे फार्मसी महाविद्यालय प्रांगण, सासवड, ता. पुरंदर. | २७,२८ एप्रिल २०११ |
| ७ | शेठ जोतिप्रसाद विद्यालय (शेजो), ता. दौंड. | ३० एप्रिल - १ मे २०११ |
| ८ | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ संचालित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिरंगुट, ता. मुळशी. | ४ व ५ मे २०११ |